Ex 11

रे.क.नं. ७३/२०२५

# मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, गारगोटी
# यांचे कोर्टात ...

**संभाजी नाना पाटील** ..... वादी

विरूध्द

**संजय आबा पाटील** ..... प्रतिवादी

**यातील प्रतिवादी तर्फे वादीचे दावेस कैफियत व म्हणणे खालीलप्रमाणे –**

१) वादीचा दावा व दावेमधील नमुद सर्व कथने खोटी, चुकीची व लबाडीची आहेत. प्रस्तुत प्रतिवादी यांना ती मान्य वा कबूल नाहीत.

२) वादी स्वच्छ हाताने या मे. कोर्टासमोर आलेले नाहीत. वादीनी बरीचशी वस्तुस्थिती (Suppression of material facts) या मे. कोर्टाचे पासून लपवून ठेवलेली असून वादी याकामी खोटी कथने करून मे. कोर्टाची दिशाभूल करू पहात आहे.

23/12/2025
Assistant Superintendent
Gargoti

३) दावा अर्जी कलम (१) मधील नमूद दावा मिळकतीचे वर्णन संदिग्ध व मोघम असून ते चुकीचे आहे.

४) दावा अर्जी कलम (२) मधील मजकूर "दावा मिळकत ही वादींची प्रत्यक्ष .......................... ते ....................................... वादी–प्रतिवादी यांचेदरम्यान कोणताही वाद नाही." हा सर्व खोटा व चुकीचा आहे. प्रस्तुत प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

५) दावा अर्जी कलम (३) मधील मजकूर "दावा मिळकत गट नं. ४७२ ही मिळकत ................................... ते ........................... मालकी हक्काने कायम झाली आहे." हा पूर्णपणे खोटा व चुकीचा आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य वा कबूल नाही. प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

६) दावा अर्जी कलम (४) मधील मजकूर "दावा मिळकती संदर्भात वादींनी ................................... ते ........................... भोगवटादार म्हणून झालेली होती व आहे." हा पूर्णपणे खोटा व चुकीचा आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य वा कबूल नाही. प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

७) दावा अर्जी कलम (५) मधील मजकूर "वादींचे मालकीचे दावा मिळकत गट नं. ४७३ ................................. ते ........................... वादींना मिळणेकरीता दाखल करणे भाग पडले आहे." हा पूर्णपणे खोटा

13/11/2023

Assistant Superintendent
Gargoti

व चुकीचा आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य वा कबूल नाही. प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

८) दावा अर्जी कलम (६) मधील नमुद दावेस कारण चुकीचे व खोटे आहे. वादीचे दावेस काहीही कारण घडलेले नाही, जे घडले म्हणून नमुद केले आहे ते साफ चुकीचे व खोटे आहे.

९) दावा अर्जी कलम (७) मधील दावेचा तपशिल व दावेची आकारणी चुकीची आहे.

१०) दावा अर्जी कलम (८) ते (१०) मधील नमुद सर्व मजकूर चुकीचा व खोटा आहे, प्रस्तुत प्रतिवादींना मान्य नाही.

११) दावा अर्जी कलम (११) मधील विनंती कलमामध्ये वादी ज्या प्रकारचे वादी दाद मागणी करतात अशा दादी त्यांना मागता येणार नाहीत. अगर कायदेशीर तरतुदीनुसार देवविताही येणार नाहीत.

१२) प्रस्तुत प्रतिवादी याकामी वादीचे दावेतील नमुद सर्व कथने, आरोप व मजकूर स्पष्टपणे नाकारीत असून अगर अनावधानाने किंवा नजरचुकीने काही मजकूर अगर कथने नाकारणेची राहून गेली असलेस ती सुध्दा याकामी प्रस्तुत प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारली आहेत असे समजणेत यावे.

23/12/2024
Assistant Superintendent
Gargoti

१३) वादीचा दावा हा अस्पष्ट व मोघम स्वरूपाचा आहे, दावेमधील नमुद मजकुराप्रमाणे वस्तुस्थिती नाही. प्रतिवादींचा गट नं. ४७२/अ हा पुर्वीपासून त्यांचे व त्यांचे कुटूंबियांचे आपसात झाले वाटपाप्रमाणे कब्जेवहिवाटीस असून सदर गट नं. ४७२/अ मध्ये प्रतिवादी यांनी सन. २००६ मध्ये बांधकाम करून घर बांधलेले आहे व सदर घराची नोंद ग्रामपंचायत गंगापूर, ता. भुदरगड यांचे दप्तरी असेसमेंट सदरी केलेली असून आजअखेरपर्यंत सदर घराची वार्षिक कराची रक्कम प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत गंगापूर, ता. भुदरगड यांचेकडे भरणा केलेली होती व आहे.

१४) वादी यांनी गट नं. ४७३ ही मिळकत दि. २८/०८/२०१९ इ. रोजी खरेदी केलेली आहे. तथापी त्यापुर्वीच म्हणजे सन. २००६ मध्ये प्रतिवादी यांनी गट नं. ४७२/अ यामध्ये घर बांधकाम केलेले होते व तेंव्हापासून म्हणजे गेली १९ वर्षे प्रतिवादी यांची सदर घरामध्ये व जागेमध्ये सलगपणे, निरंतर, विनाअडथळा, शांततामय कायदेशीर कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे प्रतिवादी हे सदर जमीनीचे व घर मिळकतीचे कायदेशीर मालक होते व आहेत, असे असता दावेमध्ये उल्लेख केलेप्रमाणे प्रतिवादी यांनी केंव्हाही अतिक्रमण करून घराचे बांधकाम केलेले नव्हते व नाही, त्यामुळे तथाकथीत अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादी यांना मागणेचा कायदेशीर हक्क व अधिकार नाही.

23/12/2025

Assistant Superintendent
Gargoti

१५) वादी यांनी दावेमध्ये प्रतिवादी यांनी ४०० चौ.फुट क्षेत्रामध्ये अतिक्रमण करून बांधकाम केलेचा मोघम उल्लेख आहे, त्याबाबत स्पष्टतेणे कथने नाहीत. वस्तविक प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारचे कसलेही अतिक्रमण करून बांधकाम केलेले नाही अगर तथाकथीत ४०० चौ.फुट क्षेत्रामध्ये अतिक्रमीत बांधकाम केलेले नाही. तसेच प्रतिवादी यांनी अगर त्यांचे कुटूंबियांनी अतिक्रमीत क्षेत्राचे भरपाईपोटी म्हणून अन्य जमीनीपैकी त्याच प्रतीची व त्याच बाझारमुल्याची जमीन वादींचे नावावर विनामोबदला करून देतो किंवा अतिक्रमण काढून घेतो असे तोंडी अभिवचन व अश्वासन केंव्हाही वादी यांना दिलेले नव्हते व नाही, त्यामुळे वादी यांनी दाखल केला आहे असा दावा कायदेशीर तरतुदीनुसार चालणेस पात्र नाही करीता फेटाळणेत यावा.

१६) वादी त्यांचे सोईनुसार दावा मिळकतीचा समजुतीचा बिनस्केल हातनकाशा याकामी हजर करून तथाकथीत ऑगष्ट २०१९ मध्ये दावा मिळकतीची मोजणी झालेबाबत खोटी कथने करून प्रतिवादी यांची जागा व इमारत/घर बळकाविणेचे दृष्ट हेतूने अतिक्रमण करून बांधकाम केले असे खोटे आरोप याकामी प्रतिवादी यांचेवर करीत आहेत. दावेमध्ये वादींनी मोजणीबाबत व तक्रारीबाबत नमुद केलेला सर्व मजकूर चुकीचा असून प्रतिवादी यांना अमान्य आहे. वादी कथन करतात त्याप्रमाणे वस्तुस्थिती नाही. प्रतिवादी यांनी गट नं. ४७२/अ मध्ये केलेले बांधकाम सन. २००६ साली केले असून १९ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून

23/12/24
Assistant Superintendent
Gargoti

पासून त्यामध्ये प्रतिवादी यांचीच माकलीहक्काने कब्जा व वहिवाट आहे. तसेच सदर घर/इमारतीचा कर, फाळा, लाईट बिल इत्यादी शासकीय, निमशासकीय कर देखील प्रतिवादी हेच भरत होते व आहेत. असे असता यदाकदाचीत सदरचे बांधकाम वादी यांचे खरेदी केले क्षेत्रामध्ये येत असलेस सदर क्षेत्राचे/जागेचे विरूध्द हक्काचे कब्जाने सन. २००६ साली बांधकाम करून घर/इमारत बांधलेपासून आजअखेरपर्यंत सलगपणे, अव्याहतपणे, अखंडपणे, निरंतर, कब्जेवहिवाटीने प्रतिवादी हे कायदेशीर मालक झालेले आहेत. त्यामुळे वादी याकामी चुकीचा व खोटा वाद उपस्थीत करून प्रस्तुत प्रतिवादी यांना नाहक त्रास देत आहेत.

१७) वादीचा दावा व दाद मागणी मुदतीत नाही.

१८) वादीस याकामी सकृतदर्शनी कथने नाहीत.

१९) न्यायाचे समबलत्व वादीचे बाजूने नसून प्रस्तुत प्रतिवादीचे बाजूने आहे.

२०) वादीचा दावा नामंजूर झालेस वादीचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट मंजूर झालेस प्रस्तुत प्रतिवादीचे कधीही न भरून येणारे असे अपरिमित नुकसान होणार असून प्रतिवादींना आपले नैसर्गिक न्याय हक्कास मुकावे लागणार आहे व प्रतिवादीवर अन्याय होणार आहे.

२१) **<u>सबब विनंती की,</u>**

अ) प्रस्तुत वादीचा दावा खर्चासह नामंजूर करणेत यावा.

23/12/20[illegible]
Assistant Superintendent
Gargoti

ब) याकामी वादीनी प्रस्तुत प्रतिवादींना नाहक खर्चात पाडलेने नुकसानी दाखल कॉम्पेंन्सेटरी कॉस्ट रू. ५०,०००/— वादीनी प्रतिवादीना देणेबाबत याचकामी आदेश व हुकूमनामा व्हावा.

क) न्यायाचे इतर योग्य ते आदेश व दादी याच कामी प्रस्तुत प्रतिवादींना मिळावेत.

ड) कारणपरत्वे कैफियत/म्हणणे दुरूस्तीस परवानगी व मुभा असावी.

येणेप्रमाणे कैफियत व म्हणणे असे.

गारगोटी

ता. २३/१२/२५

मे.जा.व्हावे.

प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी श्री. संजय आबा पाटील अशी प्रतिज्ञा करतो की, वर नमुद कैफियत व म्हणणेमधील लिहीला संपुर्ण मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा कागल ता. २३/१२/२५

प्रतिज्ञा करणार

23/12/2025

Assistant Superintendent
Gargoti

..८..

## ॲफिडेव्हीट

मी यातील प्रतिवादी श्री. संजय आबा पाटील व.व.५३,रा.गंगापूर, ता.भुदरगड, जि. कोल्हापूर शपथपुर्वक ॲफिडेव्हीट करतो की, वर नमुद कैफियतमधील व म्हणणेमधील लिहीला संपुर्ण मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु।। कागल ता. २३/१२/२५

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

ॲफिडेव्हीट करणार

(ॲड. बी.ए. म्हसवेकर)

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी श्री. संजय आबा पाटील अशी प्रतिज्ञा करतो की, वर नमुद कैफियतमधील, म्हणणेमधील व त्याखालील ॲफिडेव्हीटमधील लिहीला संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा कागल ता. २३/१२/२५

प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me
Shri. Sanjay Aaba Patil, Age 53
Of Gangapur, Tal. Bhudargad
Who is identified by
Shri. B. A. Mhasvekar Adv
Whom I know personally
Date- 23/12/2025

23/12/2025
Assistant Superintendent
Gargoti